मा. कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): नांदेड    **P.S.(ठाणे):** उस्मान नगर

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0089    **Year (वर्ष):** 2023

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 13/06/2023 20:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   Time Period (कालावधी): पहर 5

   **Date From (दिनांक पासून):** 13/06/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/06/2023
   **Time From (वेळेपासून):** 14:55 वजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:00 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

Date (दिनांक ): 13/06/2023    **Time (वेळ):** 17:00 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

Entry No. (नोंद क्र.): 025

Date & Time (दिनांक आणि वेळ): 13/06/2023 20:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 20 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दिनांदेड जिल्हा मध्यवर्ती सहका, चिखली,कंधार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव): उस्मान नगर

District(State) (जिल्हा(राज्य)): नांदेड(महाराष्ट्र)



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मधुकर संभाजी भामानगरे

(b) **Father's/Husband's Name** (वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नंदनवन,कंधार ,उस्मान नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नंदनवन,कंधार ,उस्मान नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7666548644

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री नागराज वसंतराव जोशी | | | 1 प्रतिभा निकेतन शाळेसमोर, होळी,नांदेड,नांदेड ,उस्मान नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | शंभर रुपयाची लाचेची मागनी केलेली नोट | 100.00 |



Scanned with OKEN Scanner

10.Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य (रु. मध्ये)):

100.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. UIDB Number
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 13/06/2023

फिर्याद

मधुकर संभाजी भागानगरे, वय 43 वर्ष व्यवसाय शेती, रा. नंदनवन, ता. कंधार जि.नांदेड, मो. 7666548644, आधार क्रमांक 940450051983

समक्ष पोलीस स्टेशन उस्माननगर, जि. नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, माझी मौजे नंदनवन शिवारात सर्वे नंबर 160 मध्ये 30 गुंठे शेतजमीन आहे. नमुद शेतजमीनीवर मला पीक कर्ज घ्यावयाचे आहे. त्यासाठी मी ICICI बँक शाखा नांदेड येथे गेलो असता त्यांनी विविध बँकांचे नो डयुज् प्रमाणपत्र घेवुन येण्यास सांगितले आहे. आमच्या गावातील सेवा सहकारी संस्था मर्यादित नंदनवन यांचेकडून नो डयुज् प्रमाणपत्र घेण्यासाठी मी सदर संस्थेचे सचिव श्री. नागराज जोशी यांना दि. 09/06/2023 रोजी चिखली येथे समक्ष भेटुन नो डयुज प्रमाणपत्राची मागणी केली असता त्यांनी माझेकडे 2000/- रूपयाची मागणी केली असता, पैशे कमी करण्याबाबत मी त्यांना विनंती केली. त्यानंतर दि. 12/06/2023 रोजी 12◌:25 वाजता श्री. नागराज जोशी यांचा मो.न. 9764437613 याचेवर माझ्या वरिल मोबाईल क्रमांकावरून फोन करून नो डयुज प्रमाणपत्रासाठी विचारणा केली असता त्यांनी मला 500/- रूपये घेवुन येण्यास सांगितले आहे.

मला नो डयुज् प्रमाणपत्र देण्यासाठी श्री. नागराज जोशी माझ्याकडे मागत असलेले 500/- रूपये हि कोणतीही शासकीय फीस नसुन लाच असल्याची मला खात्री आहे. त्यामुळे त्यांनी स्वतः किंवा त्यांचे वतीने इतर कोणाही माझ्या कामासाठी लाच मागणी केल्यास किंवा लाच मागणी करून स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी हि विनती. वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

मी दिनाक 12/06/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नांदेड येथे दिलेल्या तक्रारीचे अनुशगाने पोनि श्री. गजानन बोडके यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेवनु मला दोन्ही पचाची व सापळा पथकातील सर्व सदस्यांची ओळख करून दिली. त्यांनतर मी पंचाना माझी तो◌ंडी तक्रार सांगितली. माझी टाईप केलेली तक्रार पंचानी वाचुन तक्रारीवर सहया केल्या आहेत. मी व पोनि श्री बोडके यांनी तक्रारीवर पुढीच सहया केल्या होत्या. त्यानंतर मला व दोन्ही पंचाना लाच मागणी पडताळणीचा उद्देष सांगुन माझे स्वतःचे, पोनि श्री.बोडके व दोन्ही पंचाचे परिचय दर्पक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेका◌ॅर्डरमध्ये पोशि/अरशद खान यांनी रेका◌ॅर्ड केले. त्यानंतर काल दि. 12/06/2023 रोजी मी व माझा मित्र प्रदिप हुंबाड असे त्याचे कार मध्ये व पोनि श्री.बोडके, दोन शासकीय पंच व सापळा पथकातील सदस्य हे त्यांचे शासकीय वाहनात बसून मौ. चिखली गावचे अलीकडे दहीकळंबा रोडवरील चिखली शिवारात सुरक्षित ठिकाणी जावून थांबलो. लोकसेवक श्री. जोशी हे मौ. चिखली येथील शाखेत असून त्याठिकाणी त्यांची भेट घेण्यासाठी पोनि श्री. बोडके यांनी मला व पंच क्र. 1 बापुराव दिगांबरराव नामवार यांना सविस्तर सुचना देवून लाच मागणी पडताळणी करण्यासाठी लोकसेवक श्री जोशी यांची भेट घेण्यासाठी पाठविले त्यापूर्वी पोनि श्री बोडके यांच्या सुचनेवरून पोका◌ॅ/अरशद खान यांनी डिजीटल व्हाईस रेका◌ॅर्डर चालू करून दिल्याने मी व पचं क्र. 1 असे दोघे माझेकडील मित्राची मोटार सायकल क्रमांक एमएच 12 केएस 0215 वर बसून मौ. चिखली येथील दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड येथे जावून लोकसेवक श्री जोशी यांना भेटलो व त्यांना नो डयुज प्रमाणपत्र देणे बाबत विनंती केली असता, त्यांनी मला 100 रूपये दया, बेबाकी फि तसेच सात बारा बघावी लागेल. तुम्ही सात बारा घेवून या असे म्हणुन लाचेची मागणी केली. मी त्यांना आ◌ॅनलाईन सात बारा काढून घेवून येतो म्हणून परत आलो व आ◌ॅनलाईन सात बारा काढे पर्यंत लोकसेवक श्री जोशी हे बँकेतून निघून गेले होते. त्यामुळे सदर दिवशीची कार्यवाही स्थगित करून पुढील कार्यवाही दिनांक 13/06/2023 रोजी करण्याचा निर्णय घेण्यात आला. श्री जोशी यांनी मागितलेली बेबाकी फि ही कोणतेही शासकीय फि नसुन ती लाच असल्याची मला खात्री आहे.



Scanned with OKEN Scanner

दिनांक 12/06/2023 रोजी दिलेल्या सुचना प्रमाणे मी आज दि. 13/06/2023 रोजी [illegible] आलो व संपूर्ण सापळा पथकासह शासकीय वाहनात बसून मौ. चिखली गावचे अलीकडे मी [illegible] चिखली येथे जावून थांबलो व पोनि श्री बोडके यांनी मला व पंचाना काल दि. 12/06/2023 रोजी दिलेल्या सुचनांची उजळणी करून देवून सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर सापळापूर्व कार्यवाही केली असता मला व दोन्ही पंचांना पोह/चितोरे यांनी अल्ट्राव्हायोलेट लॅम्प व अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगुन अल्ट्रा व्हायोलेट लॅम्प व अँथ्रासिन पावडर यांच्या वापराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर पंचाकरवी माझी अंगझडती घेतली व मी हजर केलेले लाचेच्या रक्कमेचे वर्णन व क्रमांक पंच क्रमांक 2 श्री मारोती दत्ता सुर्यवंशी यांना कडुन एका कागदावर लिहून घेतले. त्यावर पोनि श्री. बोडके व दोन पचानी सह्या केल्या. पोह/चितारे यांनी लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावले व सदर रक्कम माझे अंगावरील शर्टच्या डाव्या बाजुस असलेल्या खिशात ठेवली व लाच स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा मला सांगुन अशी सविस्तर सापळा पुर्व कार्यवाही केली.

त्यानंतर पोनि श्री बोडके यांच्या सुचनेवरुन पोका /अरशद खान यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून देवून माझे गळ्यात सुरक्षित ठेवले व त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे आम्ही दोघे माझेकडील मित्राची मोटार सायकल क्रमांक एमएच 12 केएस 0215 वर बसून मौ. चिखली येथील दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड येथे जावून लोकसेवक श्री जोशी यांना जावून भेटलो व मी त्यांना नो ड्युज प्रमाणपत्र देणे बाबत विनंती केली असता, त्यांनी मला हाताने पैशाचा ईशारा करून त्यांचा उजवा हात पुढे केला असता, मी माझे जवळील अँन्थ्रासिन पावडर लावलेली 100 रूपयाची नोट त्यांचे उजव्या हातात दिली असता, त्यांनी ती नोट घेवून त्यांचे अंगातील शर्टच्या वरच्या डाव्या बाजुच्या खिष्यात ठेवली. त्यानंतर मला जोशी यांनी नो ड्युज प्रमाणपत्र दिले. तेव्हा मी त्यांना याची काही पावती वगैरे असती काय, असे विचारले असता, त्यांनी याची पावती वगैरे राहिना असे म्हणून मला पावती दिली नाही. त्यानंतर मी बाहेर येवून सापळा रचून थांबलेल्या पथकातील सदस्यांना लोकसेवक श्री जोशी यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित ईशारा करताच आमचेवर लक्ष ठेवून असलेले पोनि श्री. बोडके, पंच क्रमांक 2 व सापळा पथकातील सर्व सदस्य तेथे हजर येवुन लोकसेवक श्री जोशी यांना 14:55 वाजताचे सुमारास पकडुन पुढील कार्यवाही केली.

तरी दिनाक 12/06/2023 रोजी शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीत सेवा सहकारी संस्था मर्यादीत नंदनवन, ता. कंधार, जि. नांदेड सचिव श्री नागराज वसंतराव जोशी यांनी मला सेवा सहकारी संस्थेचे नो ड्युज प्रमाणपत्र देण्यासाठी 100 रूपये फि असल्याचे भासवून लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान आज दि. 13/06/2023 रोजी 14:55 वाजताचे सुमारास मौ. चिखली येथील दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड येथे सेवा सहकारी संस्था मर्यादीत नंदनवन, ता. कंधार, जि. नांदेडचे सचिव श्री नागराज वसंतराव जोशी, वय 50 वर्षे, रा. चिंचोली, ता. कंधार, जि. नांदेड, सध्या राहणार अरूण धर्माधिकारी यांचे घरी भाडयाने, प्रतिभा निकेतन शाळेसमोर, होळी, नांदेड, जि. नांदेड यांनी माझाकडुन 100 रूपये लाचेची रक्कम स्विकारून पदाचा दुरूपयोग करून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेस फिर्याद आहे.

समक्ष फिर्याद दिली सही

( गजानन बोडके )
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. नांदेड



Scanned with OKEN Scanner

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कार्यवाही: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation:
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pandurang digambar bharti(I (Inspector)) / POBN80930 or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Gajanan Bodke

Rank (पद): Police Inspector ACB Nanded No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(... ASI)
पोलीस ठाणे अमलदार

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): pandurang digamba

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): POBN80930



Scanned with OKEN Scanner

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the** ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेहरा के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner